# मुलांच्या सुरक्षिततेसंबंधी सप्ताहाचे आयोजन

पुणे : पंख संस्था, खडक पोलिस स्टेशन आणि क्विकहील फाउंडेशन यांच्यातर्फे जिजामाता मुलींची शाळा, महात्मा गांधी विद्यालय, उर्दू विद्यालय मुलींचे १३ जी, मुलांचे विद्यालय १३ बी आणि शासकीय उर्दू अध्यापिका विद्यालयात 'सेफ्टी फॉर चिल्ड्रन एव्हरीवेअर' हा सप्ताह आयोजित करण्यात आला होता.

पंख संस्थेच्या समुपदेशकांनी व्यसनावर आधारित पथनाट्य सादर केले. या पथनाट्यात व्यसनांमुळे निर्माण होणारे धोके सांगण्यात आले. पंख संस्थेच्या अध्यक्षा स्मिता आपटे यांनी मुलांशी संवाद साधून, मुलांना व्यसनांमुळे निर्माण होणारे शारीरिक, मानसिक, भावनिक, कौटुंबिक, सामाजिक आणि आर्थिक धोके समजावून सांगितले. 'पंख'तर्फे बाललैंगिक 'पोक्सो' कायद्याबद्दल माहिती देण्यात आली.

खडक पोलिस स्टेशनचे पोलिस उपनिरीक्षक राहुल खंडाळे आणि पोलिस उपनिरीक्षक जयंत हंचाटे यांनी मार्गदर्शन केले. या वेळी इस्माइल शेख, पोलिस नाईक ढगे, पोलिस शिपाई सचिन माळी, भाग्यश्री येलाले, मच्छिंद्र कदम आणि शाळेच्या मुख्याध्यापिका उपस्थित होत्या.



'सेफ्टी फॉर चिल्ड्रन एव्हरीवेअर' या सप्ताहानिमित्त पंख संस्थेच्या समुपदेशकांनी व्यसनावर आधारित पथनाट्य सादर केले.